# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 01.04.2026** **वार- बुधवार**

---

**कार्यशाळा**

माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव अभियानात उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देणे, ग्रामीण भागातील नागरिकांच्या सामुहिक वर्तणुकीत बदल घडवणे आणि आरोग्यदायी जीवनशैली रुजवण्यावर भर देण्यात येत आहे. त्यामुळे लोकसहभागाच्या माध्यमातून गाव आरोग्य संपन्न करण्यावर भर द्यावा, असं आवाहन सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबीटकर यांनी केलं आहे. या अभियानाच्या विभागीय कार्यशाळाच्या उद्घाटनप्रसंगी ते आज पुण्यात बोलत होते.

या कार्यशाळेत पुण्यासह मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा आणि सांगली जिल्ह्यातील आरोग्य विभागाचे पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते.

**कुपीवरची**

पुण्यातील सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या वतीनं ऊसतोड मजुरांच्या मुलांसाठी ‘कोपीवरची शाळा’ हा उपक्रम राबवण्यात आला. यंदाच्या हंगामात ४८६ मुलांची नोंद झाली होती. त्यापैकी ६ ते १४ वयोगटातील २३८ मुलांची शैक्षणिक क्षमता तपासण्यात आली. हंगामअखेर झालेल्या चाचणीत १८२ मुलांच्या शैक्षणिक स्तरात सुधारणा झाल्याचं दिसून आले. या मुलांना संचालक मंडळाच्या हस्ते प्रगतिपुस्तकं देण्यात आली. गावाकडे परतण्यापूर्वी या मुलांनी करंजेपूल इथल्या एका केंद्रामध्ये संगणक हाताळण्याचा आनंद घेतला. तसंच ‘रागणी फाउंडेशन’तर्फे ऊसतोड मजूर महिलांना साड्यांचं वाटप करण्यात आलं, वाणेवाडीच्या ‘साद संवाद’ ग्रुपनं कपड्यांचं वाटप करून मजुरांना निरोप दिला.

**जनगणना**

भारतीय जनगणनेचं पुणे महापालिका क्षेत्रातील कामकाज दोन टप्प्यात होणार असून घरांची यादी आणि गणना पहिल्या टप्प्यात १ मे ते १४ जून या कालावधीत होणार आहे. प्रथमच स्वगणनेचा पर्याय

उपलब्ध असून यासाठी स्वतंत्र पोर्टलची निर्मिती केली आहे. त्यावर महाराष्ट्रातील नागरिक १ मे ते १५ मे या कालावधीत स्वतः माहिती भरु शकतील. प्रथम ३४ प्रश्नांची माहिती भरून ती सादर केल्यानंतर नागरिकांना एक विशिष्ट ओळख क्रमांक मिळेल तो जपून ठेवायचा आहे. १६ मे ते १४ जून या कालावधीत घरी येणाऱ्या जनगणना अधिकारी किंवा प्रगणक यांना तो द्यायचा आहे. जास्तीत जास्त पुणेकर नागरिकांनी स्वगणनेत माहिती भरून सहकार्य करावं असं आवाहन महापालिका आयुक्त नवल किशोर राम तसंच अतिरिक्त विशेष आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी केलं आहे.

**मिळकत**

पुणे महापालिकेच्या इतिहासात प्रथमच उच्चांकी मिळकत कराचं संकलन झालं आहे. शहरामध्ये अंदाजे पंधरा लाख मिळकती असून यावर्षी 31 मार्चपर्यंत 2 हजार 985 कोटी रुपयांपेक्षा जास्त मिळकत कर जमा झाला आहे. यापैकी ऑनलाईन स्वरुपात मिळकत कर भरणं नागरिकांनी जास्त पसंत केलं आहे.

**मुदत**

राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत २०२५ च्या राज्यस्तरीय विविध कृषी पुरस्कारांसाठी ऑनलाईन पद्धतीनं अर्ज करण्याची मुदत आता १५ एप्रिलपर्यंत वाढवण्यात आली आहे. पूर्वी ही प्रक्रिया ऑफलाइन स्वरूपात असल्यानं शेतकऱ्यांना कागदपत्रांच्या चार प्रती तयार करण्यासाठी मोठा खर्च आणि वेळ लागत असे. आता ही प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी सरकारनं यंदापासून स्वतंत्र ऑनलाइन पोर्टल विकसित केलं आहे. कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी कृषी विभागानं ही मुदत १५ दिवसांनी वाढवून दिली आहे.

**पालखी**

पुण्यातील पालखी सोहळ्याच्या नियोजन बैठकीत केवळ भवानी पेठेतील वाढती गर्दी आणि अपुऱ्या जागेवर चर्चा झाली. ही चर्चा भाविकांची सोय आणि सुरक्षिततेसाठी उत्तम पर्याय शोधण्याच्या उद्देशानं करण्यात आली होती. भवानी पेठेतील मुक्काम हलवण्याचा अथवा पुण्यातील एक दिवसाचा मुक्काम कमी केल्याचा निर्णयही झालेला नाही, असं संस्थानच्या वतीनं स्पष्ट करण्यात आलं आहे. भाविक आणि वारकरी बांधवांनी कोणत्याही संभ्रमात पडू नये असा खुलासा ज्ञानेश्वर महाराज संस्थान समितीनं केला आहे.

पुण्याच्या मुक्कामाबाबत सध्या सोशल मीडिया आणि काही माध्यमांमध्ये सुरू असलेल्या चर्चांवर संस्थाननं हे स्पष्टीकरण दिलं आहे.

**<u>हनुमान</u>**

हनुमान जयंतीनिमित्त उद्या पिंपरी-चिंचवड शहरात हनुमान सामूहिक सुंदरकांड महापर्वाचं आयोजन करण्यात आलं आहे. शहरातील विविध धार्मिक संस्थांच्या वतीनं आयोजित या कार्यक्रमात अनेक भाविक सहभागी होणार आहेत. या महापर्वात सुंदर कांडचं पठण आणि 52 लाख वेळा जय श्रीरामचा जप करण्यात येणार आहे.

म्हातोबापुण्यात हिंजवडी इथलं ग्रामदैवत म्हातोबा देवाच्या यात्रेनिमित्त उद्या शहरातील वाहतुकीत मोठे बदल करण्यात आले आहेत. यात्रेदरम्यान होणाऱ्या पारंपरिक बगाड मिरवणुकीमुळं हिंजवडी ते वाकड मार्गावर प्रचंड गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी विविध रस्त्यांवर वाहतूक निर्बंध लागू केले आहेत.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**